## सहकारनगर येथे अपार्टमेंट मध्ये वेश्या व्यवसाय, विशेष बाल सुरक्षा पथकाच्या छाप्यात एका मुलींची सुटका, एक अटक

पुणे शहरात गुप्तपणे चालणा-या वेश्या व्यवसायाचे समुळ उच्चाटन करणेचे लक्ष्य मा. पोलीस आयुक्त सो, पुणे शहर यांनी ठेवलेले असुन त्यानुसार त्यांनी वेळोवळी गुन्हे शाखेकडील अधिकारी यांना सुचना व आदेश दिले होते.

शिल्पा चव्हाण, पोलीस निरीक्षक विशेष बाल सुरक्षा पथक, पुणे यांना सहकारनगर पोलीस स्टेशन चे हद्दीत अपार्टमेंट मध्ये वेश्या व्यवसाय चालु असल्याची माहीती मिळाली. त्यानुसार सदर ठिकाणी शिल्पा चव्हाण व त्यांचे पथकाने छापा घातला असता तेथे महिला नामे रुक्मिणी एकनाथ मिटकर वय- ३५ रा. गुरुकृपा अपार्टमेंट, चौथा मजला फ्लॅट नंबर १३ धनकवडी, सावरकर चौकाजवळ पुणे ही सदर ठिकाणी एका महिलेस अतिरिक्त पैशांचे आमिष दाखवुन त्यांचेकडुन वेश्या व्यवसाय करवुन घेत होती. नमुद युवतींची सुटका करणेत आली असुन तीस रेस्क्यु फाऊंडेशन मध्ये ठेवणेत आले आहे. तसेच रुक्मिणी एकनाथ मिटकर हीस गजाआड करणेत आले आहे.

सदर कारवाई ही मा.श्री. डॉ.के.व्यंकटेशम, पोलीस आयुक्त सो, पुणे शहर, मा. अशोक मोराळे सो, अपर पोलीस आयुक्त सो, गुन्हे, मा. श्री. बच्चन सिंह सो,पोलीस उप आयुक्त सो, गुन्हे व मा. श्री. शिवाजी पवार, सहा पोलीस आयुक्त गुन्हे पुणे यांचे मार्गदर्शनाखाली शिल्पा चव्हाण, पोलीस निरीक्षक विशेष बाल सुरक्षा पथक, सपोफौज. झाजरे, पोहवा. ५५७२ देशमुख, पोहवा. ३२७६ केदार, पोहवा. ५८४० आटोळे, पोहवा. ५६७४ सगर, मपोशि. ७०७८ काचळे, मपोशि. १०८५८ कांबळे, मपोशि. ६३०१ जगताप गुन्हे शाखा पुणे शहर यांचे पथकाने पार पाडली.

(शिल्पा चव्हाण)
पोलीस निरीक्षक
विशेष बाल सुरक्षा पथक
गुन्हे शाखा पुणे शहर